शिरगाव–परंदवडी पोलीस ठाणे
पिंपरी–चिंचवड पोलीस आयुक्तालय,
पत्ता–परंदवडी ता. मावळ, जि.पुणे पिन नं. ४१०५०६
फोन नंबर– (०२११४) २३७४११,९४२३९८७४११
ई मेल आय.डी.– pishirgaon.pcpc-mh@gov.in



प्रेसनोट दिनांक २५/११/२०२६

शिरगाव परंदवडी पोलीस स्टेशनची उल्लेखनीय कामगिरी

खुनाचे गुन्हयाचा अवघ्या एक तासांत उलगडा करून आरोपींना घेतले ताब्यात..

दिनांक २३/११/२०२६ रोजी सकाळी ०९.०० वा. चे सुमारास शिरगाव परंदवडी पोलीस ठाणेस माहीती मिळाली की, पोलीस ठाणे हद्दीतील मौजे ओझर्डे गावचे हद्दीत निर्जनस्थळी मोकळया जागेमध्ये एक इसम रक्तबंभाळ अवस्थेत आहे. सदर माहीती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक देवेंद्र चव्हाण हे स्वत: स्टाफसह घटनास्थळी दाखल झाले.

सदर ठिकाणी एक ३५ ते ४० वयोगटातील इसम निपचित अवस्थेत पडुन होता. त्यावेळी त्याचे अंगात हाफ बाह्यांचा टी शर्ट व निळे रंगाची साधी पॅन्ट, पायामध्ये निळे रंगाचे सॅन्डल घातलेले व त्याचे डोक्यास गंभीर स्वरूपाच्या जखमा झाल्याचे तसेच तो पडुन असलेल्या ठिकाणाजवळच खडकावर रक्ताचे थारोळे पडलेले होते.

सदर प्रकार हा घातपाताचा असल्याचे लक्षात येताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक देवेंद्र चव्हाण यांनी आजुबाजुचे पोलीस ठाण्यांना संपर्क करून त्यांचे पोलीस ठाण्यांमध्ये मागिल दोन दिवसांत दाखल असलेल्या अपहरणाचा गुन्हयांची माहीती घेतली असता तळेगाव दाभाडे पोस्टेचे वपोनि किशो पाटील यांचेकडुन समजले की, सदर ठिकाणी पडुन असलेल्या व्यक्तीच्या वर्णनाचे व्यक्तीचे टाटा सोसायटी सोमाटणे फाटा येथुन कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अपहरण केलेबाबत गुन्हा दाखल असल्याचे समजल्याने वपोनि देवेंद्र चव्हाण यांनी तात्काळ सदर व्यक्तीचे नातेवाईकांसोबत संपर्क केला. त्यांना घटनास्थळी बोलाविले असता सदर ठिकाणी पडुन असलेल्या व्यक्तीचा भावाने सदर व्यक्तीची ओळख पटली व सदर इसमाचे नाव योगेश अरूण भांमरे असल्याचे समजले.

सदर प्रकरणाची अधिक चौकशी करता योगेश भांमरे हे दिनांक २२/११/२०२६ रोजी त्यांचे मित्राकडे खरवस करण्यासाठी लागणारा चिक/गायीचे कच्चे दुध आणण्यासाठी गेल्याचे समजले. त्यावरून योगेश भांमरे यांचेसोबत कंपनीमध्ये काम करणारा त्यांचा मित्र नामे सिध्देश भगवान साळुंके वय २३ वर्षे रा. सडवली, ता. मावळ, जि. पुणे यास संशयावरून ताब्यात घेवुन त्याचेकडे चौकशी केली असता त्याने एक महीन्यापुर्वी सोबत काम करतांना कंपनीमध्ये झालेल्या भांडणाचे कारणाचा राग मनात धरून योगेश अरूण भांमरे यास खरवस करण्यासाठी लागणारा चिक/गायीचे कच्चे दुध देण्याचे बहाण्याने त्याचे राहते घरातुन उर्से येथे बोलावले. उर्से येथील पद्मावती मंदीराचे जवळुन त्यास स्वत:चे बुलेट गाडीवर बसवुन ओझर्डे येथील निर्जन स्थळी मोकळया जागेमध्ये घेवुन गेला. तेथे आधीपासुनच थांबुन असलेला आरोपीचा मित्र व दुसरा संशयीत आरोपी नामे संदीप बाळु चव्हाण वय २६ वर्षे रा. भऊरवाडी, ता. मावळ, जि. पुणे असे दोघांनी मिळुन योगेश अरूण भांमरे याचे डोक्यावर व चेहऱ्यावर कोयत्याने व लाकडी काठीने मारहाण करून त्याचा खून केल्याचे निष्पन्न झाल्याने नमुद दोन्ही आरोपीस तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे दाखल गुन्हा रजि. नं. ५२९/२०२६ भान्यासं क. १३८, १४० (३) चे पुढील तपासकामी सुपुर्त करण्यात आले आहे.

सदरची महत्वपुर्ण कारवाई मा. श्री. विनय कुमार चौबे (पोलीस आयुक्त), मा. डॉ. शशिकांत महावरकर (सह पोलीस आयुक्त) मा. श्री. सारंग आवाड (अपर पोलीस आुयक्त–गुन्हे), मा. श्री. बसवराज तेली (अपर पोलीस आुयक्त–प्रादेशिक विभाग), मा. श्री. विक्रांत देशमुख (पोलीस उपायुक्त वाहतुक विभाग अति.कार्य. परि.०४), मा. श्री. प्रविण मोरे (सहायक पोलीस आयुक्त देहुरोड विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली शिरगाव परंदवडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देवेंद्र चव्हाण, मसपोनि रत्नमाला सांवत/चौधरी, पोउपनि अशोक केंद्रे, नाईद शेख, विठ्ठल काळे, पोलीस अंमलदार दिनकर भुजबळ, मारूती सोनटक्के, सचिन काचोळे, काजल आघाव, संतोष दिघे, चंद्रधर कोंडे, मुरलीधर कोकतरे, योगेश गुळींग, सुधीर वाडीले, किशोर गिरीगोसावी, अमोल गोरे, प्रसाद जंगीलवाड, संतोष तांबे, संतोष शिंदे यांचे पथकाने विशेष कारवाई केलेली आहे.

(श्वेता खेडकर)
पोलीस उपायुक्त परि.०४
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय